महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत
ओम सुपर मार्केट जवळ, बहिरट पाटील चौक,
शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. :तंशिविकापु/विवि-५/वाहन निर्लेखन/२०२३/ 2377 दिनांक : 01 JUN 2023

**परिपत्रक**

तात्काळ

प्रति,
प्राचार्य,
या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय संस्था
**(पुणे विभाग पुणे)**

**विषय : - संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या वाहनाच्या निर्लेखनाबाबत**
**संदर्भ :-** दिनांक २६.०५.२०२३ रोजी संचालनालय स्तरावर आयोजित ऑनलाईन बैठकीतील सूचना

उपरोक्त संदर्भांकीत विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय संस्थांना/कार्यालयांना नवीन वाहन उपलब्ध करुन देण्याची बाब वरिष्ठ कार्यालयाच्या विचाराधीन असून त्याकरीता संस्थांमध्ये नादुरुस्त व कालबाह्य असलेल्या वाहनांचे निर्लेखन व त्याची विक्री करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र मा. संचालक, तंत्रशिक्षण म. रा. मुंबई (कार्यासन क्र. ११) यांना सादर करावयाचे आहे.

सबब, सर्व संस्था प्रमुखांना याद्वारे कळविण्यात येते की, त्यांचे संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या नादुरुस्त व कालबाह्य वाहनांची " **महावाहन** " प्रणालीमध्ये योग्य ती नोंद घ्यावी व सदर वाहनाबाबत सद्यस्थिती कळवावी तसेच नादुरुस्त व वापरण्यास अयोग्य असणाऱ्या वाहनांची नियमानुसार निर्लेखनाची प्रक्रिया त्वरीत पूर्ण करुन त्याची विक्री करावी व तसे प्रमाणपत्र संचालनालयातील कार्यासन क्र. ११ ला सादर करण्यात यावे. संस्थेतील वाहन नस्तीमध्ये निर्लेखनाबाबतची सर्व कागदपत्रे जतन करुन ठेवावी. सुस्थितीत असलेल्या वाहनांबाबत उपरोक्त कार्यवाही करण्यात येवू नये तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अवगत करुन देण्यात यावे.

(डॉ.द.व्य.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे.

प्रत : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्र.११) यांना माहितीस्तव सादर.
२. प्रोग्रामर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शीत करणेकरीता.